**मानीव अभिहस्तांतरणाची प्रक्रिया दिनांक ०१/०५/२०१४ पासून ऑनलाईन करण्याबाबत.**

## महाराष्ट्र शासन
## सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
## शासन निर्णय क्रमांकः सगृयो २०१३/अनौ-०२/प्र.क्र.२३५/१४-स

मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०००३२

तारीख: ७ जुन, २०१४

**वाचा**

१) शासन परिपत्रक क्र. सगृयो २०१३/अनौ-०२/ प्र.क्र.२३५/१४-स, दिनांक २९ एप्रिल २०१४.

**प्रस्तावना**

नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांचे अभिहस्तांतरण बिल्डर करुन देत नाहीत किंवा बिल्डर सहकार्य करीत नाहीत अशा प्रकारच्या अनेक तक्रारी संस्थांकडून शासनास व सहकार आयुक्त कार्यालयास प्राप्त होत होत्या. त्यामुळे महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ व नियम १९६४ मध्ये काही सुधारणा करणे आवश्यक असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली. त्यानुसार सहकारी गृहनिर्माण संस्थांचे अभिहस्तांतरण करण्यासाठी शासनाने महाराष्ट्र मालकी हक्कांच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ व नियम १९६४ मध्ये सुधारणा करुन शासन राजपत्र प्रसिद्ध केले आहे.त्यानुसार मानीव अभिहस्तांतरणाची प्रक्रिया मानवी हस्तक्षेप टाळण्यासाठी पूर्णत: ऑनलाईन पद्धतीने करावयाची असल्याने त्याबाबत खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**शासन निर्णय -**

मानीव अभिहस्तांतरणासंदर्भात येत असलेल्या अडचणी व त्या दूर करण्यासंदर्भात सहकार विभागाकडून विशेप मोहिम टप्पा-२ यशस्वी होणेसाठी (१) मानीव अभिहस्तांतरण मोहिमेमध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांकडून सहज व सुलभ पद्धतीने ऑनलाईन अर्ज भरता यावेत यासाठी ऑनलाईन पद्धतीचा अवलंब करणे व (२) ऑनलाईन पद्धतीने मानीव अभिहस्तांतरणाची प्रक्रिया राबविण्यासाठी संगणक आज्ञावली (software) तयार करण्याची कार्यवाही गृहनिर्माण व महसूल विभागाच्या सहाय्याने सहकार विभागाने तयार करावयाची होती. त्यानुसार आवश्यक ती संगणक आज्ञावली तयार करण्यात आली असून मानीव अभिहस्तांतरणाचे काम ऑनलाईन करण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. तसेच मुंबईतील व राज्यातील सर्व जिल्हा उपनिबंधक व त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांना ऑनलाईन काम करण्याचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. यास्तव यापुढे मानीव अभिहस्तांतरणाचे काम केवळ ऑनलाईन पद्धतीने करावयाचे असल्याने खालील नमूद टप्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**१)**मानीव अभिहस्तांतरण करण्यासाठी भरावयाच्या अर्जाचा नमुना मोफा कायदयानुसार तयार करण्यात आलेल्या http://mahasahkar.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.